MHNS230014352018

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.८२२/२०१८**

**न्यु बजरंग ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. वि. प्रविण भटाटे**

**निशाणी क्र. २३ वर आदेश**

फिर्यादीने प्रस्तुतचा अर्ज पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.१९ व निशाणी क्र.२१ लगत दाखल केलेले कागदपत्रे परत मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**०२.** फिर्यादीने कथन केले आहे की, प्रस्तुत खटल्यातील आरोपी विरुध्द याच फिर्यादीने या न्यायालयात प्रस्तुत खटल्या व्यतिरीक्त संक्षिप्त फौजदारी खटला क्र.८२०/२०१८ हा खटला दाखल केलेला आहे. फिर्यादीचे पुढे असे कथन आहे की, नजरचुकीने संक्षिप्त फौजदारी खटला क्र.८२०/२०१८ या खटल्यातील पुराव्याचे प्रतिज्ञापत्र व कागदपत्रे नजरचुकीने फिर्यादीने प्रस्तुत खटल्यात दाखल केलेले आहेत तरी पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.१९ व निशाणी क्र.२१ लगत दाखल केलेले कागदपत्रे फिर्यादीस परत देण्याचा आदेश होण्याची विनंती फिर्यादीने केली आहे.

**०३.** आरोपीने सदर अर्जावर त्यांचे म्हणणे मांडले त्यांनी फिर्यादीच्या अर्जास हरकत घेतली आहे. आरोपीने त्यांच्या म्हणण्यात असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज कायदेशीर नसल्याने रदद करण्यात यावा.

**०४.** दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुतचा खटला धनादेश क्र.०३६१२० अनादरीत झाला असल्याने दाखल करण्यात आला आहे. निशाणी क्र.१९ लगत फिर्यादीने दाखल केलेले पुराव्याचे प्रतिज्ञापत्र व निशाणी क्र.२१ लगत असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादीने धनादेश क्र.०३६११७ अनादरीत झाल्याबददल पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रा मध्ये नमुद केले व तेच कागदपत्रे प्रस्तुत खटल्यात दाखल केलेले आहेत. याच न्यायालयात प्रलंबित संक्षिप्त

फौजदारी खटला क्र.८२०/२०१८ च्या फिर्यादीचे अवलोकन केले असता निशाणी क्र.१९ लगत दाखल असलेले पुराव्याचे प्रतिज्ञापत्र व निशाणी क्र.२१ लगतचे कागदपत्रे हे प्रस्तुत खटल्या संदर्भात नसून संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ८२०/२०१८ या खटल्याच्या संदर्भात आहे. त्यामुळे निशाणी क्र.१९ लगत दाखल केलेले पुराव्याचे प्रतिज्ञापत्र व निशाणी क्र.२१ लगत दाखल केलेले कागदपत्रे फिर्यादीस देणे न्यायोचित ठरेल. फिर्यादी यांनी निशाणी क्र.२१ लगत दाखल केलेले कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती प्रस्तुत खटल्यात दाखल कराव्यात. वरील बाबी विचारात घेता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**— आदेश —**

१) निशाणी क्र.२३ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) फिर्यादी यांना पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.१९ व निशाणी क्र.२१/१ ते निशाणी क्र.२१/१० वरील सर्व मुळ कागदपत्रे परत देण्यात येत आहे.

३) फिर्यादी यांनी निशाणी क्र.२१ लगत दाखल केलेले कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती प्रस्तुत खटल्यात दाखल कराव्यात.

**सही/—**
**( आर.एन.खान )**
**न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग**
**इगतपुरी**

**दिनांक :— १९/११/२०२१**